-: प्रेस नोट :-

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड
दिनांक.04/10/2019

## लोकसेवक भास्कर नामदेव बेदरे, तलाठी सजा पिंपळा, ता.आष्टी जि.बीड यांना 1,000/-रुपये लाच स्विकारल्या प्रकरणी गुन्हयामध्ये शिक्षा

---

तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे येवून तक्रार दिली होती की, तक्रारदार यांचे वारसा हक्काने शेतीची नोंद करणेसाठी पिंपळा सजाचे तलाठी बेदरे हे 1,000/- रुपयाची लाचेची मागणी करीत आहेत.वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरुन दि.15/02/2012 रोजी लोकसेवक बेदरे यांचे विरुध्द सापळयाचे आयोजन केले असता त्यांना तक्रारदार यांचेकडुन 1,000/-रु. लाच रक्कम स्वीकारताना पंच, साक्षीदारांसमक्ष रंगेहात पकडण्यात आले होते.

सदर गुहयाचा तपास श्री.साबळे, तत्कालीन पोलीस निरीक्षक ॲसीबी बीड तसेच श्री. भिमराव शिंगाडे, पोलीस उपअधीक्षक, ॲसीबी बीड यांनी पुर्ण करुन मा. विशेष न्यायालय, बीड येथे दोषारोपपत्र दाखल केले असता स्पेशल केस नं. 07/2012 प्रमाणे सदरची केस कोर्टात चालु होती.

आज दि.04/10/2019 रोजी मा.श्री.उल्हास त.पौळ, जिल्हा न्यायाधीश व सहाय्यक सत्र न्यायाधीश कोर्ट क्रमांक-2 बीड यांनी सदर केसमध्ये निकाल दिलेला असून आरोपी लोकसेवक भास्कर नामदेव बेदरे, तलाठी सजा पिंपळा, ता.आष्टी जि.बीड यांना दोषी ठरवून कलम 13(1)(ड)सह 13(2) लाप्रका-1988 अन्वये 2 वर्षे सक्त मजुरी व 2,000/-रु. दंड, दंड न भरल्यास 6 महिने सक्त मजुरी अशी शिक्षा दिलेली आहे. सरकारी पक्षातर्फे श्री. बी.एस.राख, सहाय्यक सरकारी अभियोक्ता कोर्ट, बीड यांनी काम पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील व पोह/ बी.बी.बनसोडे, पोकॉ/गारदे यांनी मदत केलेली आहे.

याद्वारे आवाहन करण्यात येते की, नागरिकांना त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक/लोकप्रतिनिधी लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड कार्यालयाचे खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| टोल फ्री क्रमांक | :- 1064 |
| दुरध्वनी क्रमांक | :- 02442/222649 |
| मेल आयडी | :- dyspacbbeed@gmail.com |
| वेबसाईट | :- www.acbmaharashtra.gov.in |
| मोबाईल ॲप | :- www.acbmaharashtra.net |
| फेसबुक पेज | :- www.facebook.com/MaharashtraACB |

(राजकुमार पाडवी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.